0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-** १) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दि. २०/०८/२०११ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त झालेले कागदपत्र.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५९/२०११/जा.६९६, दि. २६/०८/२०११, १९/०९/२०११ व ०१/१०/२०११.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, चेंबूर पोलिस ठाणे, मुंबई यांचे दि. २७/०९/२०११ रोजीचे अभिवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५९/२०११/जा. ९९३
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक : ११ /११/२०११.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांना मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार तेथील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचासह दिनांक ११/०८/२०११ रोजी रात्री ११:०० वाजता शताब्दी हॉस्पीटल, ड्युक्स कंपनीजवळ, घाटला, चेंबूर येथील रोडच्या विरुध्द बाजूस आतमध्ये असलेल्या साई मोटर्स नामक गॅरेजच्या ठिकाणी धाड टाकली असता, तेथे रिक्षा क्र. एमएच-०३-एके-३३८६ मधून ३५ लिटर क्षमतेचे एकूण ८ काळ्या रंगाचे कॅन उतरवतांना दोन इसमांना पकडण्यात आले. सदर इसमांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांची नावे साजिद अहमद, रिक्षा ड्रायव्हर व मोहम्मद सलीम असे सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष कॅन उजेडामध्ये पाहिले असता, त्यामध्ये केरोसिनचा वास येणारा द्रवरुप निळ्या रंगाचा पदार्थ असल्याचे आढळले. यावरुन हा द्रवपदार्थ निळे केरोसिन असल्याची अधिकाऱ्यांची खात्री झाली.

सदरचे निळे केरोसिन कोठून आणले याबाबत रिक्षा चालकाकडे विचारणा केली असता, त्याने गेल्या १० दिवसांपासुन सदर रिक्षा भाड्याने चालविण्यास घेतली असल्याचे तसेच त्याला या केरोसिनबाबत काहीच माहिती नसल्याचे सांगून त्याने फक्त भाडे मिळाले म्हणून कुर्ल्यापासून चेंबूरपर्यंत आलो असल्याचे सांगितले. दुसरा इसम

मोहम्मद सलीम याच्याकडे चौकशी केली असता, कुर्ल्यातील शिधापत्रिकाधारकांकडून रुपये १५-१६/- या दराने थोडे थोडे केरोसिन जमा करुन एकत्रितपणे दर आठ-पंधरा दिवसांनी तो या ठिकाणी नेहमी आणतो आणि गॅरेजमधील ट्रक चालकांना रुपये २४ ते २५/- या दराने विकून पैसे कमावतो. हे ट्रकचालक हायवेवरील ढाब्यावर हे केरोसिन विकतात. मात्र याबाबत अधिक माहिती नसल्याचे त्याने सांगितले. याबाबत दोन्ही इसमांचा स्वतंत्रपणे लेखी जबाब नोंदवून घेण्यात आला आहे.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन शासनाने अनुदानित दराने फक्त शिधावाटप दुकानातून शिधापत्रिकांद्वारे पात्र शिधापत्रिकाधारकांना उपलब्ध करुन दिलेल्या शासन नियंत्रित केरोसिन स्वतःच्या फायद्यासाठी अवैधमार्गाने प्राप्त करुन त्याची अनधिकृतपणे व बेकायदेशिररित्या विक्री, साठवणूक व वाहतूक केल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द [१] जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ [२] बॉम्बे रेशनिग एरिया शेडयुल्ड कमोडीटीज रेग्यूलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन ऑर्डर १९८६ चे कलम ४, ५, ६, ७, ८ तसेच [३] दि केरोसिन (रिस्ट्रीक्शन ऑन युज अॅण्ड फिक्सेशन ऑफ सिलिंग प्रायजेस) ऑर्डर, १९९३ चे कलम ३ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द चेंबूर पोलिस स्टेशन, मुंबई येथे स्था.गु.क्र. १४८१/२०११ दि.१२/०८/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ३५ लि. क्षमतेच्या काळ्या रंगाच्या एकूा ८ कॅनमधील निळ्या केरोसिनचा साठा | २८० लिटर | १०,६४०/- |
| २ | ३५ लि. क्षमतेचे एकूण ८ रिकामे ड्रम | ८ नग | ८००/- |
| ३ | रिक्षा क्र. एमएच-०३-एके-३३८६ | १ नग | १,२८,०००/- |
| | | एकूण | १,३९,४४०/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उप नियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी वरील वाचावे क्र. १ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली असून, त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०८/०९/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०८/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी / अपचारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुढील संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक २७/०९/२०११ रोजी ठेवण्यात आली व तसे सर्व संबंधितांना कळविण्यात आले.

दिनांक २७/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री. एस. टी. आळवणे उपस्थित राहीले व त्यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे वाचावे क्र. ३ अन्वये अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मोहमद सलिम व रिक्षा क्र. एमएच-०३-एके-३३८६ चे चालक साजिद अहमद हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याकरिता सुनावणीची पुढील तारीख मिळावी म्हणून विनंती केली. सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. आरोपींनी केलेल्या विनंतीनुसार पुढील सुनावणी दिनांक ११/१०/२०११ रोजी ठेवण्यात आली व तसे सर्व संबंधितांना कळविण्यात आले.

- दिनांक ११/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस मोहम्मद सलीम व रिक्षा क्र. एमएच-०३-एके-३३८६ चे चालक साजिद अहमद हे उपस्थित राहिले व त्यांना सदर प्रकरणी काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगितले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयाकरीता राखुन ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री. एस. टी. आळवणे यांनी युक्तीवाद केला की, गुन्ह्यात हस्तगत करण्यात आलेले केरोसिन हे ज्वालाग्राही असून त्याचा साठा पोलिस ठाणेस करुन ठेवणे धोकादायक असल्याने तसेच केरोसिनची गळती होत असल्याने सदर केरोसिनची विल्हेवाट लावण्याची परवानगी मिळणेस विनंती आहे, असे सांगून तसे लेखी अभिवेदन सादर केले.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांना मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार तेथील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचासह दिनांक ११/०८/२०११ रोजी रात्री ११:०० वाजता शताब्दी हॉस्पीटल, ड्युक्स कंपनीजवळ, घाटला, चेंबूर येथील रोडच्या विरुध्द बाजूस आतमध्ये असलेल्या साई मोटर्स नामक गॅरेजच्या ठिकाणी धाड टाकली असता, तेथे रिक्षा क्र. एमएच-०३-एके-३३८६ मधून ३५ लिटर क्षमतेचे एकूण ८ काळ्या

रंगाचे कॅन उतरवतांना दोन इसमांना पकडण्यात आले. सदर इसमांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांची नावे साजिद अहमद, रिक्षा ड्रायव्हर व मोहम्मद सलीम असे सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष कॅन उजेडामध्ये पाहिले असता, त्यामध्ये केरोसिनचा वास येणारा द्रवरुप निळ्या रंगाचा पदार्थ असल्याचे आढळले. यावरुन हा द्रवपदार्थ निळे केरोसिन असल्याची अधिकाऱ्यांची खात्री झाली.

सदरचे निळे केरोसिन कोठून आणले याबाबत रिक्षा चालकाकडे विचारणा केली असता, त्याने गेल्या १० दिवसांपासुन सदर रिक्षा भाड्याने चालविण्यास घेतली असल्याचे तसेच त्याला या केरोसिनबाबत काहीच माहिती नसल्याचे सांगून त्याने फक्त भाडे मिळाले म्हणून कुर्ल्यापासून चेंबूरपर्यंत आलो असल्याचे सांगितले. दुसरा इसम मोहम्मद सलीम याच्याकडे चौकशी केली असता, कुर्ल्यातील शिधापत्रिकाधारकांकडून रुपये १५-१६/- या दराने थोडे थोडे केरोसिन जमा करुन एकत्रितपणे दर आठ-पंधरा दिवसांनी तो या ठिकाणी नेहमी आणतो आणि गॅरेजमधील ट्रक चालकांना रुपये २४ ते २५/- या दराने विकून पैसे कमावतो. हे ट्रकचालक हायवेवरील ढाब्यावर हे केरोसिन विकतात. मात्र याबाबत अधिक माहिती नसल्याचे त्याने सांगितले. याबाबत दोन्ही इसमांचा स्वतंत्रपणे लेखी जबाब नोंदवून घेण्यात आला आहे. यावरुन सदरची रिक्षा व त्यामधील ३५ लि. क्षमतेच्या ८ कॅनमधील २८० लिटर निळे केरोसीनचा साठा जप्त करण्यात आला.

पोलिसांनी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या अभिवेदनात, गुन्ह्यात हस्तगत करण्यात आलेले केरोसिन हे ज्वालाग्राही असून त्याचा साठा पोलिस ठाणेस करुन ठेवणे धोकादायक असल्याने तसेच केरोसिनची गळती होत असल्याने सदर केरोसिनची विल्हेवाट लावण्याची परवानगी मिळणेस विनंती केलेली आहे. घटनास्थळी दिलेल्या जबाबानुसार साजिद अहमद यांनी त्यांना कुर्ला ते चेंबूर असे रिक्षासाठी भाडे मिळाले. त्याच्या रिक्षामध्ये मोहम्मद सलीम नामे इसम ८ कॅन घेऊन बसला. सदर कॅनमध्ये केरोसिन असल्याचे त्यास माहित नव्हते, असे सांगून व्यवसायाच्या दृष्टीने भाडे मिळाले म्हणून त्याने प्रवाशाचे भाडे स्वीकारले असल्याचे सांगितले. तसेच आरोपी मोहमद सलीम यांनी कुर्लातील शिधापत्रिकाधारकांकडून १५ ते १६ रुपये या दराने थोडे थोडे केरोसिन जमा करुन एकत्रितपणे दर ८ ते १५ दिवसाने घटनास्थळी आणून गॅरेजमधील ट्रक चालकांना २४ ते २५ रुपये या दराने विकून पैसे कमावितो असे सांगितले. सदर केरोसिन शासनाने अनुदानित दराने शिधापत्रिकाधारकांना अधिकृत शिधावाटप दुकानातून विक्री करण्यासाठी दिलेले असले तरीही त्याची विना परवाना खरेदी अथवा विक्री करणे बेकायदेशिर असल्याचे माहित असून सुध्दा त्यांनी आर्थिक फायद्याच्या दृष्टीने सदरचे कृत्य केल्याचे जबाबात सांगितले. यावरुन आरोपी यांनी स्वतःच्या फायद्यासाठी जाणीवपूर्वक शासन नियंत्रीत निळे केरोसिनची अवैधमार्गाने व बेकायदेशीररित्या खरेदी, विक्री, वाहतूक व साठवणूक केल्याचे सिध्द होते. सदर गुन्ह्यातील आरोपी मोहमद सलीम व रिक्षा क्र. एमएच-०३-एके-३३८६ चे चालक साजिद अहमद यांनी सुनावणीच्या दरम्यान त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे मौखिकरित्या सांगितले. यावरुन त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही

खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते. सबब, प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण निळे केरोसीनचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेली रिक्षा क्र. एमएच-०३-एके-३३८६ चा शासन नियंत्रित निळे केरोसीनची बेकायदेशीररित्या खरेदी, विक्री व वाहतूक करण्यासाठी गैरवापर केला आहे. तसेच जप्त रिक्षा क्र. एमएच-०३-एके-३३८६ चे मालक यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेसी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. तसेच जप्त रिक्षा परत मिळण्याकरीता कोणीही दावा केलेला नाही. यावरुन रिक्षा क्र. एमएच-०३-एके-३३८६ चे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त रिक्षा परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचे जप्त करण्यात आलेली रिक्षा क्र. एमएच-०३-एके-३३८६ ही त्यांच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास रिक्षाचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे रिक्षा त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा रिक्षा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या रिक्षाची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये चेंबूर पोलिस स्टेशन, मुंबई येथे स्था.गु.क्र. १४८/२०११ दि.१२/०८/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

## आदेश :-

१) जप्त करण्यात आलेला संपूर्ण निळे केरोसीनचा एकुण २८० लिटर साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेले सदरचे निळे केरोसिन उपनियंत्रक शिधावाटप, ई- परिमंडळ कार्यालय, वडाळा यांचे मदतीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांस, पोलीसांनी नियंत्रीत दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेली रिक्षा क्र. एमएच-०३-एके-३३८६ ही शासनजमा करण्यात येत आहे. सदर रिक्षाच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास रिक्षाचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरची रिक्षा त्याच्या मालकास परत करण्यात यावी व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही

करण्यापूर्वी रिक्षाच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी. अथवा रिक्षा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या रिक्षाची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरची रिक्षा लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

४) ३५ लिटर क्षमतेचे एकूण ८ रिकामे ड्रम पोलीसांनी किरकोळीने प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE

प्रति,

१) रिक्षा क्र. एमएच-०३-एके-३३८६ चे चालक, साजिद अहमद
२) रिक्षा क्र. एमएच-०३-एके-३३८६ चे मालक
३) मोहम्मद सलीम
(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, चेंबूर पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, चेंबूर पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ई - परिमंडळ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.